अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

# दुष्काळाची गंभीरता वाढली !



परतूर ।प्रतिनिधी

दक्षिण काशी म्हणून संबोधल्या जाणारी गोदावरी नदी जालना जिल्ह्यातून देखील वाहते.या वर्षी अल्प अश्या पावसाने परतूर तालुक्यातील आष्टी परिसरातील गोदावरी नदी पात्र आटण्याच्या मार्गांवर आहे,या जीवनदायींनी नदीने शेतकरण्याच्या पिकांना जल सिंचन केले जाते, तथा नदीपात्रात मासेमारी करणाऱ्या कहार समाजाच्या व्यवसायचे हे मुख्य स्रोत मानले जाते.परंतु आता नदी पात्राची खालावत जाणारी पातळी पाहून शेतकरी आणी मासेमारी करण्याऱ्या बांधवामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे !कित्येक शेतकऱ्यांच्या पिकांसाठी गोदावरी नदी हे मुख्य पर्याय आहे,कृषी क्षेत्रातील अनेक गरजा नदीमुळे पूर्ण होतात,परंतु आत्ता नोव्हेंबर च्या सुरुवातीलाच दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांना सतावू लागले आहेत.सुरुवातीला चांगल्या पावसाची अपेक्षा होती मात्र पावससाने अनाकलनीय घेतलेल्या उघडीप मुळे आत्ता येणाऱ्या पावसाळ्यापर्यंत पाण्याचे नियोजन करणे ही शेतकरी बांधवांसाठी मोठी गंभीर समस्या उभी राहिली आहे.यामुळे परिसरातील मोठ्या प्रमाणातील कृषी क्षेत्र पाण्याभावी प्रभावित होण्याची चिन्हे आहेत.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -६१ | सोमवार दि.२० नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -61 | MONDAY DT.20 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मराठवाड्यासाठी पाणी सुटेपर्यंत रास्ता रोको सुरूच राहणार: जालना रोड ठप्प

अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील पुढार्यांनी मराठवाड्याच्या हक्काचे ८.६ टीएमसी पाणी रोखून धरले आहे. यामुळे मराठवाड्यातील जनतेमध्ये संताप आहे. आज सकाळी सिंचन भवनसमोर जालना रोडवर हक्काचे पाणी सोडावे या मागणीसाठी सर्वपक्षीय रस्तारोको करण्यात येत आहे. भाजप वगळता सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, संघटना सहभागी झालेल्या या रस्तारोकोने जालना रोडवर वाहतूक कोंडी झाली आहे.

यावेळी जालना रोडच्या दोन्ही लेनवर आंदोलक बसल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली आहे. जोपर्यंत पाणी सोडले जात नाही तोपर्यंत हा रास्ता रोको सुरूच ठेवण्याचा निर्णय यावेळी आंदोलकांनी घेतला. आंदोलनात सहभागी नेत्यांची पाणीप्रश्नावर एकजूट दिसून आली. या आंदोलनात माजी मंत्री राजेश टोपे, शिवसेनेचे प्रवक्ता संजय शिरसाठ, माजी मंत्री अर्जुन खोतकर, अनिल पटेल, माजी आमदार डॉ. कल्याण काळे ,अण्णासाहेब माने, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार किशोर पाटील ,माजी आमदार नामदेव पवार, अमरसिंह पंडित, बदामराव पंडित, माजी महापौर नंदकूमार घोडेले, उद्योजक अर्जुन गायके, मसीआ संघटनेचे पदाधिकारी पाणी हक्क परिषदेचे पदाधिकारी यांच्यासह भाजप वगळता सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी सहभागी झाले आहेत.



मराठवाड्यातील जनतेला गृहीत धरू नये

यावेळी बोलताना राजेश टोपे म्हणाले, मराठवाड्यातील जनतेला राज्य सरकारने गृहीत धरू नये. आम्ही आमच्या हक्काचे पाणी मागतोय हे पाणी १५ ते २० सप्टेंबर दरम्यान सोडणे आवश्यक होते. मात्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकर्ते संचालकांनी ३० ऑक्टोबर रोजी पाणी सोडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेऊन २० दिवस उलटले तरी अद्याप ८.६ टीएमसी पाणी दिले गेले नाही.

आता शांत बसणार नाही

दुष्काळग्रस्त मराठवाड्याला पाण्याची गरज आहे. असे असताना अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील पुढार्यांनी मुद्दामहून आपले पाणी रोखून धरले याचा फटका गोरगरीब जनता शेतकरी उद्योजक यांना बसणार आहे. यामुळे आम्ही आता शांत बसणार नाही, असा इशारा आमदार संजय शिरसाठ यांनी दिला. तातडीने पाणी सोडण्याचा निर्णय झाला नाही तर मराठवाड्यातील एकाही आमदाराने हिवाळी अधिवेशनात सहभागी होऊ नये असे आवाहनही शिरसाठ यांनी घ्यावी केले.

संयम सुटत चालला आहे

अर्जुन खोतकर म्हणाले, मराठवाड्यातील जनता शांततेच्या मार्गाने आंदोलन करणारी आहे. संतांच्या भूमितील असल्यामुळे आधी विनंती केली, निवेदने दिली परंतु, पाणी सोडण्यात आले नाही. यामुळे आता आमचा संयम सुटत चालला आहे. जोपर्यंत पाणी सोडणार नाही तोपर्यंत आम्ही इथून उठणार नाही.

# शिक्षक भरतीमध्ये होणार कुणबी प्रमाणपत्राचा लाभ-शिक्षणमंत्री केसरकर

राज्यात शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू असून, ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे, त्यांना ओबीसीचा फायदा मिळेल. शिक्षकांची कमतरता असल्याने शाळांवर जो परिणाम झाला आहे, तो गृहित धरता लवकरात लवकर भरती होईल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली. सकाळी जळगावच्या अजिंठा शासकीय विश्रामगृहात माध्यमांशी ते बोलत होते.




शिक्षकांची भरतीप्रक्रिया व दुसरीकडे मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी, यामुळे भरती प्रक्रियेवर काही परिणाम होईल का, या प्रश्नावर दीपक केसरकर म्हणाले, भरती प्रक्रिया करत असताना अनेक ठिकाणी आरक्षित जागा या खुल्या प्रवर्गात टाकल्यामुळे खुल्या जागांची संख्या कमी झाली होती. आम्ही प्रयत्नपूर्वक या सर्वांची पाहणी करून खुल्या जागा वाढविल्या. याबाबत मराठा समाज संघटनांचीही मागणी होती. यामुळे खुल्या प्रवर्गात पुरेशा जागा उपलब्ध झाल्या. ईडब्लूएस आरक्षणाचा फायदा या भरतीमध्ये मिळेल. तसेच, मध्य महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कुणबी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. जे खुल्या प्रवर्गात आहेत त्यांना त्यातून संधी आहेच, मात्र ज्यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे त्यांना ओबीसीचा फायदा मिळू शकेल, असेही दीपक केसरकर यांनी सांगितले.




पाणी आंदोलन

मराठवाड्याच्या हक्काचे पाणी जायकवाडी प्रकल्पात सोडले पाहिजे यासाठी आज छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्याच्या वतीने आंदोलन होणार आहे यासाठी माजलगाव येथून भाजपा माजलगाव मतदार संघाचे नेते श्री रमेशराव आडसकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी कार्यकर्ते एक मोठी ट्रॅव्हल्स व खासगी गाडीने रवाना झाले यावेळी माजलगाव ते छत्रपती संभाजी नगर संपूर्ण प्रवास रमेशराव आडसकर साहेब यांनी कार्यकर्त्यासोबत ट्रॅव्हल्स मध्ये केला=ऋ=ज



**सांत्वन भेट**

**स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे निष्ठावंत म्हणून ओळखले जाणारे भाजपा नेते विलास बामणे यांचे मोठे बंधू संतोष बामणे यांचे काही दिवसापूर्वी देहांत झाले, त्यानिमित्त बीड जिल्ह्याच्या दबंग खासदार प्रितमताई मुंडे यांनी आज बामणे याच्या घरी भेट दिली सातंत्वन पर भेट दिली..!**

## चौसाळा परिसरात गुन्हेगारी वाढली : अनेक गुन्ह्यांचा तपासही प्रलंबित

# चार पोलिस कर्मचाऱ्यांकडे २५ गावांची सुरक्षा

चौसाळा ।प्रतिनिधी

नेकनूर पोलिस ठाण्याअंतर्गत चौसाळा (ता. बीड) येथे पोलिस चौकी आहे. या अंतर्गत चौसाळा व पालसिंगण हे दोन बिट आहेत. या दोन बीटमध्ये एकूण पंचवीस गावे आहेत. या गावांची लोकसंख्या पाऊण लाखापेक्षा जास्त असून, या सर्वांच्या सुरक्षेची जबाबदारी फक्त चार पोलिस कर्मचारी व दोन वाहन चालक यांच्यावर आहे.अपुऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांमुळे कार्यरत असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांवर पोलिस चौकीचे दैनंदिन कामकाज, विविध कार्यक्रमांची सुरक्षा, कार्यक्षेत्रात घडलेल्या गुन्ह्यांचे तपास आदी कामांचा भार वाढला आहे. परिणामी, चौसाळा पोलिस दुरक्षेत्र कार्यक्षेत्रात चोऱ्यांचे तसेच इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे.या पोलिस दुरक्षेत्राअंतर्गत चौसाळा बीटमध्ये चौसाळा,

## बीड जिल्हाधीकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार-विवेक कुचेकर

कानडी घाट, गोलंग्री, घारगाव, सुलतानपूर, पिंपळगाव घाट, माळेवाडी, रूईगव्हाण, मानेवाडी, लोणीघाट, वाढवणा ही अकरा गावे असून, पालसिंगण बीटमध्ये पालसिंगण, खडकी घाट, जेबापिंप्री, देवी बाभूळगाव, धोत्रा, चांदेगाव, पोतरा, मुर्शदपूर फाटा, रौळसगाव, गोगलवाडी, सातरा, चांदणी, हिंगणी खुर्द, हिंगणी (बु) ही चौदा गावे आहेत.धुळे- सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावर चौसाळा पोलिस दूरक्षेत्र हे बीड आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असून, याचा काही भाग हा बीड आणि अहमदनगरनगर



जिल्ह्याच्या सीमेलगत आहे. यामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. याठिकाणी नऊ ते दहा पोलिस कर्मचाऱ्यांची गरज आहे. या बाबत नेकनूर पोलीस स्टेशन चे सह्यायक पोलीस निरीक विलास हजारे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली आणि तुम्ही एस.पी. सरांशी बोला हे एस.पी. सरांचे काम आहे असे ते म्हणाले. चौसाळा पोलीस चौकीला तात्काळ कर्मचारी संख्या वाढविण्यात अन्यथा लोकशाही मार्गाने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन छेडण्याचा ईशारा सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी दिला आहेचौसाळा पोलिस चौकी ही दोन जिल्ह्यांच्या सीमेवर असल्याने चोऱ्या आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. तसेच मागील अनेक गुन्ह्यांचा आणि चोऱ्यांचा तपास प्रलंबित आहे. त्यामुळे येथील पोलिस चौकीत कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी अशी मागणी विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी करून देखील यागोष्टीकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केला आहे

# उपेक्षितांचे जग : धूसर लोकशाहीचे ज्वलंत वास्तव !

राज्याच्या आणी केंद्राच्या सत्तेमध्ये वाटाघाटी करण्यासाठी अनेक पैलूंचा विचार केला जातो मुख्यत्वे एखाद्या प्रतिनिधींच्या मागे उभी असलेली स्थानिक जनता त्यातही विशेष करून जात हा फॅक्टर प्रामुख्याने मैलाचा दगड ठरतो. परंतु कित्येक वर्षांपासून राज्याच्या आणी देशाच्या विविध भागातून इत्यंभूत रोजगारासाठी सततचे स्थलांतर करण्याऱ्या कामगार वर्गाची प्रतिनिधी म्हणून प्रामाणिकपणे कोणीच जबादारी घ्यायला तयार होत नाही ही शोकांतीका आहे ! राज्यांतर्गत स्थलांतरीत होणाऱ्या कामगार वर्गात जाणतेपणाने दुर्लक्षित झालेला महाराष्ट्रातील एक समाज म्हणजे कहार-भोई समाज ! पारंपरिक मासेमारी करणे का मुख्य व्यवसाय असेलेला हा समाज आज राज्याच्या कानाकोपऱ्यात नदी,तलाव,धरणे यांच्या बाजूला आपले छोटेसे पालं/झोपडी बनवून अस्थिर अश्या रोजगाराच्या शोधात असतो.शेती पीकवण्यासाठी जमीन नसल्याने, कायमच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे सतत या ठिकाणावरून पुढच्या ठिकाणी कुटुंबासोबत वास्तव्य करावे लागते,यात प्रामुख्याने हेळसांड होते ती शाळकरी लहान मुलांची,स्थिर शिक्षणाचा पर्याय उपलब्ध नसल्याने या समाजातील कित्येक मुले शाळाभाह्य वातावरणात वावरू लागतात आणी परंपरेने चालत असलेली संघर्षगाथा त्यांच्या रूपात पुढेही अशीच कायम राहते ! राज्याच्या विविध भागातून प्रत्येक वर्षी हजारो कहार-भोई समाजाचा समाजवर्ग रोजगारासाठी उपयुक्त असणाऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होऊन, तिथेच मासेमारी करून रोजगाराची तात्पुरती साधने शोधून उपजीविका भागवतो मात्र या सर्वांनमध्ये शासन स्तरावरून अपेक्षेप्रमाणे न मिळणाऱ्या सहकार्यामुळे या वर्गाला आजूबाजूच्या राजकीय,धनिक,आणी अन्यायी प्रवृत्ती असणाऱ्या कंटकाडून अनेकवेळा त्रासही सहन करावा लागतो, विविध शासकीय योजनापासून अथवा शासनाने जारी केलेला घोषणेच्या अंबलबजावणी पासून वंचित ठेवले जाते असे या समाज वर्गाचे प्रत्यक्ष अनुभव आहेत.महाराष्ट्राच्या पैठण,उजनी (बारामती), परभणी, जालना,आणी बीड या ठिकाणांवर असलेल्या जलाशयाच्या अवतीभोवती या समाजाचे वास्तव्य मोठ्या प्रमाणावर आढळून येते, परंतु विज्ञान युगातील शिक्षणाचे महत्व, राजकीय आणी समाजिक सत्तेचे महत्व



यांच्या लक्षात आले आहेत पिढ्या दर पिढ्या चालत आलेल्या या वंचित वर्गाला आत्ता मुख्य प्रवाहात येण्यासाठी शासकीय इच्छा शक्तीची सोबतच शोषितांचा आवाज शासन दरबारीं मांडणाऱ्या प्रबळ प्रतिनिधी ची आवश्यकता आहे .कहार - भोई समाज प्रामुख्याने मासेमारी व्यवसाय करत असला तरी बदलत्या काळानुसार रोजगारांच्या उपलब्धतेसाठी ते इत्यादी मार्गाचा अवलंब करताना दिसतात,दुष्काळाच्या काळात मासेमारी व्यवसाय पूर्णपणे ठप्प होतो या काळात भागीदारी तत्वावर इतरांच्या शेतात टरबूज लावणे या ३ महिन्यांच्या काळात ते आपला उदरनिर्वाह भगवत असतात.पिढ्यान पिढ्या पासून समाजाला मिळत नसणाऱ्या सेवा-सुविधा, विविध योजना बाबतची कोणत्याही प्रकारे हरकती आक्षेप न घेता,आपल्या कामावरती व कष्टा वरती आपला दृढ विश्वास ठेवून,कहार - भोई समाजाचे बांधव गेल्या अनादिकाळापासून, आपल्या पिढ्यानपिढ्याचा उदरनिर्वाह करत आहेत,मात्र आपल्याला सुद्धा आपले हक्क आणी प्रश्न मांडण्यासाठी आवाज असावा,लिखित आणी कायदेशीर प्रक्रिया आपल्याही करता याव्या हे त्यांच्या लक्षात आले आहे.शैक्षणिक मूल्ये आणी महत्व लक्षात घेत पै-पै जोडून समाजवर्ग आपली मुले शिकवण्यासाठी जिद्दी असल्याचे दिसून येते,महागड्या शिक्षण व्यवस्थेत शासकीय धोरणा मार्फत समाजवर्गाने मिळून सतत ची केलेली वसतिगृहाची मागणी असो, निर्मनुष्य ठिकाणी जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ येऊ नये म्हणून घरकुलांची मागणी असो,स्वच्छतागृहांची मागणी असो लाखो आणी करोडोंच्या घोषणेत मात्र धूळ खात पडलेली आहे.शासकीय लाभापासून कोसो दूर ठेवल्यामुळे झालेली या समजाची दुर्दशा प्रकर्षणाने आजही जाणवते, तरीही परिस्थिती जैसे थे वर अडून आहे,शासन वर्गातील बडे बाबूंनी या समाजाला योग्य तो न्याय देत मुख्य प्रवाहाच्या वाटा यांच्यासाठी यांच्या येणाऱ्या पुढील पिढीसाठी मोकळ्या कराव्यात अशी अपेक्षा आहे,संघर्षातून आपल्या अस्तित्वाला टिकवणार्या या समाजाचा वापर केवळ मत पेटी इतकांचं मर्यादित न राहता यांच्या हक्क आणी न्यायांसाठी सभागृहात आणी रस्त्यावर उतरून सरकारला संविधानिक प्रश्न विचारणाऱ्या लढाऊ प्रतिनिधीची या समाजाला गरज आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या केज तालुक्यात शाखा उद्घाटनाचा झंजावात

## अशोक हिंगे यांच्या हस्ते केज तालुक्यात एकाच दिवशी ११ शाखेचे झाले उद्घाटन

केज ।प्रतिनिधी

केज तालुका व विधानसभा संघात वंचित बहुजन आघाडीच्या पक्ष संघटन बांधणी चा कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आला असून केज तालुका व मतदारसंघात दहा शाखा मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करून कार्यकारण्या जाहीर करण्यात आल्या. मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांच्या सोबत जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, युवक अध्यक्ष बाबुराव मस्के, तालुकाध्यक्ष बाबासाहेब मस्के, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खरात, धम्मानंद कासारे, ऊसतोड कामगार नेते रानबा उजगरे, लिंबराज गायकवाड, बालाजी जगतकर, प्रदीप गायकवाड,अभिजीत वावळ, आदी उपस्थित होते.

या शाखा उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील बोलताना म्हणाले की गाव तिथे वंचितची शाखा स्थापन करून पक्ष संघटना मजबूत करा.आगामी निवडणुकीत सर्व निवडणुकाला सामोरे जायचे आहे त्यासाठी सज्ज व्हा असे त्यांनी सांगितले, २५ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे संविधान सन्मान महालीत एड.प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली होत असून यामध्ये बीड जिल्ह्यातील हजारोच्या संख्येने सहभागी होण्याचे आव्हान त्यांनी यावेळी प्रत्येक शाखेच्या उद्घाटन वेळी केले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या शाखा उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात लाडेगाव येथून करण्यात आली.त्यानंतर मुलेगाव, कळंमआबा, भिमनगर केज, गाजी,भोपला,बोरगाव,उत्तरेश्वर पिंपरी, मसाजोग, विडा येथे समारोप करण्यात आला.




या सर्वच गावामध्ये मोठ्या उत्साहात ग्रामस्थांनी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत व सत्कार केला. जिल्ह्याचे तालुक्याचे शहराचे व ग्रामीण भागातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंचित बहजन आघाडीचे केज तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते ११ गावातील सर्व शाखा पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देऊन जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# वाळूंज येथील आदिवासी महिलेचा केला भाऊबीज सन्मान.प्रा. किसन चव्हाण

बीड ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वाळुंज गावच्या आदिवासी कुटुंबावर येथील प्रस्थापित भाजपा आमदार सुरेश धस यांच्या पत्नी व गावगुंडांनी शेतीच्या वादातून प्रचंड अन्याय अत्याचार केला. आदिवासी कुटुंबावर झालेल्या अन्यायाविरोधात येथील डीवायएसपी कार्यालयास वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड. प्रकाश आंबेडकर यांनी विराट मोर्चा काढून टाळ ठोकलं.भयभीत झालेल्या आदिवासी कुटुंबा सोबत वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते ठामपणे उभे असून आदिवासी कुटुंबाच्या न्यायासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका ही लवकरच दाखल करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.दिवाळीनिमित्त वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष एड.प्रकाश आंबेडकर यांचेकडून भाऊबीजेची भेट असल्याचे प्रा.किसन चव्हाण यांनी म्हटले.

दि.१८ नोव्हेंबर २०२३ शनिवार रोजी एडवोकेट प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशान्वये वाळुंज गावच्या आदिवासी पीडित महिलेस दीपावली निमित्त वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड प्रभारी प्रा किसन चव्हाण यांच्या हस्ते साडी चोळी देऊन सन्मान केला.यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तक्रार निवारण समितीचे राज्य अध्यक्ष प्रा.विष्णु जाधव ,बीड जिल्हाध्यक्ष उद्धव खाडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा एड.अनिताताई चक्रे,नंदाताई भंडारे,ऍड दिपक श्यामदिरे, नीताताई बंदरे, दिलीप माने,बाळासाहेब गायकवाड, प्यारेललाभाई शेख, सचिन मेघडंबर अमोल साखरे, चंद्रकांत औसमल ,बाळासाहेब गायकवाड, सुरज निकाळजे, अशोक निकाळजे, आकाश निकाळजे, संपत गायकवाड, शहीद कुरेशी, कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात बनसारोळा येथे ऊस उत्पादक उद्योजक शेतकऱ्यांची परिषद झाली यावेळी ५ हाजार द्यावा. कुठल्या ही वजन काट्यावर ऊस मोजुन आण्याची परवानगी कारखान्यानी द्यावी अशा मागणी करण्यात आली, आन्याथा ऊसावर लाढा उभा करण्याची घोषणा झाली.

### छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलात सुविधांची वानवा तर

# जिल्ह्यातील क्रिडा संकुलासाठी कोट्यवधींचा निधी अखर्चित निषेधार्थ लक्ष्यवेधी खो -खो आंदोलन:- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज संकुल दुरावस्था, बीड जिल्ह्यातील ११ क्रिडा संकुलासाठी १०५ कोटी रुपयांचा निधी अखर्चित असुन रखडलेले काम पूर्ण करण्यात यावे, बीड जिल्ह्यातील ९ तालुक्यांना क्रिडा अधिकारी नाही त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत आदि क्रिडा विषयक समस्यां निवारणासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ऊद्या दि.२० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी खो -खो आंदोलन करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव,क्रिडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन, सचिव क्रिडा व युवक कल्याण मंत्रालय मुंबई यांना निवेदन देण्यात आले यावेळी रामनाथ खोड, शेख युनुस, मिलिंद सरपते,सुदाम तांदळे, शेख मुबीन, शेख मुस्ताक,शिवशर्मा शेलार, अशोक येडे, भिमराव कुटे , सय्यद सादेक, संजय पावले आदि सहभागी होते.



बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यायाला क्रिडा संकुल उभारण्याची सन २०१३ पुर्वी ५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.ईमारत जिम हाल,बडमिंटन, विद्युतीकरण, संरक्षक भिंत,खो -खो , कबड्डी, हॉलीबॉल विविध खेळांसाठी मैदाने तयार करणे,क्रिडा साहित्य खरेदी आदिं साठी निधी देण्यात आलेला आहे.बीड जिल्हायातील क्रिडा संकुलासाठी एकुण १०५ कोटी रुपये पडुन आहेत मात्र क्रिडा संकुलाचे काम रखडलेले असुन तातडीने पुर्ण करण्यात यावे.

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुलाची दुरावस्था असुन सुविधांची वानवा आहे.पिण्याचे पाणी नाही,खेळाडुंना कपडे बदलण्यासाठी (चेंजींग रूम नाही), मैदानावर धुळ असुन लान नाही, सुशोभीकरण नाही, पावसाळ्यात चिखल होतो,पाण्याचा निचरा नाही, आदि असुविधा असुन सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

बीडला ११ क्रिडा अधिकारी यांची पदे मंजूर असुन तब्बल २ वर्षांपासून ९ तालुक्यांना क्रिडाधिकारीच नाहीत.४ महीन्यापुर्वी बीडच्या क्रिडाधिका-यांनी राजीनामा दिला असुन गेवराईचे अधिकारी कायम रजेवर असतात.निधी खर्च करण्याच्या समितीत आमदार हे अध्यक्ष तर तालुका क्रिडाधिकारी सचिव आहेत.मात्र पदे रिक्त असल्याने कामे रखडली आहेत.

# कापसाला दहा हजार प्रती क्विंटल भाव द्या-किरण जावळे

आष्टी ।प्रतिनिधी

आपल्या महाराष्टात सरासरीपेक्षा यावर्षी कमी पाऊस पडलेल्या आहे आणी त्यातल्यात्यात मराठवाडा तर दुष्काळात होरपळून निघत आहे यात सर्वात जास्त नुकसान जर कोणाच होत असेल तर शेतकप्यांच कारण एकतर पाऊस नाही आणी पाऊस कमी असल्याने पीक चांगले आलेच नाहीत आणी जे दरवर्षी च्या तुलनेत यावर्षी तीस ते चाळीस टक्के पीक आले आहे.त्यालाही आज बाजारात कवडीमोल भावाने विक्री करावी लागत आहे.या कवडीमोल भावाने विकलेला भावाने शेतकरी अजुन जास्त संकटात जात आणी शेतकप्यांना संकटातून बाहेर काढण्याच काम शासनाच



आहे.म्हणुन जो काही बाजारात आलेल कापूस हे पीक आहे. त्याला तात्काळ दहा हजार प्रती क्विंटल भाव द्यावा आणी शेतकप्यांना आधार द्यावा.अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार किरण जावळे यांनी माध्यमांशी बोलताना केली=ऋ=ज

# गझल गायक वसंत हावळे यांचा गौरव

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

सुरताल संगीत विद्यालय आणि कलारत्न पुरस्कार समितीच्या वतीने अंबाजोगाई शहरातील जेष्ठ गझल गायक मा. वसंतराव हावळे यांच्या वाढदिवसानिमित्याने आणि त्यांच्या कलेचा गौरव म्हणून भव्य सपत्निक सत्कार करण्यात आला. अध्यक्ष सत्यवान शिंदे, अभय जोशी,डॉ.संदीप जैन,डॉ. देवराज चामनर,राहुल देशपांडे, श्रीधर देशपांडे, सेलमुकर,सौ.मंजुषा देशपांडे,सौ.रोहिणी गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. रोहिणी गायकवाड म्हणाल्या की,जेष्ठ गायक




वसंतराव हावळे यांनी आपल्या कलेने शहराचा,मराठवाडयाचा लौकिक वाढविला सुरताल संगीत विद्यालयाने त्यांच्या सांगितिक कार्यांचा गौरव केला अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाची भुमिका व आभार अभय जोशी यांनी मानले. मान्यवरांच्या गीत गायनानंतर समारोप करण्यात आला

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ ( मर्या.)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनाच्या प्रचार व प्रसारासाठी लातुर येथे दिनांक २३/११/२०२३ रोजी सकाळी वेळ ११.०० वाजता मांतग व तत्सम १२ पोट जातीतील समाज बांधवांसाठी महामंडळा मार्फत रोजगार व स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

लातुर व बीड जिल्हयातील मांतग व तत्स्म १२ पोट जातीतील समाज बांधवांसाठी महामंडळा मार्फत विविध योजना राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत व शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्या करिता योजनांचा प्रचार व प्रसारासाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. उपस्थित मातंग समाज बांधवांना मार्गदर्शन करण्याकरिता मा. महाव्यवस्थापक व मा.व्यवस्थापकीय संचालक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुबंई यांची उपस्थिती असणार आहे. तसेच समाजातील कार्यकर्ते, यशस्वी उद्योजक, महामंडळाच्या योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी, पुरस्कार विजेते मान्यवर व नामांकित व्यक्ती यांना निमंत्रित करण्यात आले आहे. तरी समाज बांधवांनी बहुसंख्येने या मेळाव्यास उपस्थितीत राहावे.

मेळाव्याचे ठिकाण - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कार्यालय, लातूर डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर, गुळ मार्केट, लातूर येथे उपस्थित राहावे असे आव्हान बीड येथील जिल्हा व्यवस्थापक व्ही.एस.सोनवणे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) बीड यांनी केले आहे.

# भाजपने महाराष्ट्र पेटवला

## मराठा-ओबीसी वादामागे सरकारचा हात, नाना पटोलेंचा आरोप; राज्यपालांनी हस्तक्षेप करण्याची मागणी

मुंबई / प्रतिनिधी

राज्यातील दुष्काळ, बेरोजगारी, महागाई या मुद्द्यांवरुन लक्ष हटवण्यासाठी सरकारनेच मराठा-ओबीसी वाद निर्माण केला आहे. स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी भाजपने महाराष्ट्र पेटवला, असा गंभीर आरोप आज काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. तसेच, राज्यपालांनीच हस्तक्षेप करण्याची मागणीही त्यांनी केली.

जाणीवपूर्वक वादआज पत्रकार परिषदेत नाना पटोले म्हणाले, राज्यात आज जो मराठा-ओबीसी वाद निर्माण झाला आहे, तो निर्माण करण्यात सरकारच सहभागी आहे. राज्यातील प्रश्नांवरुन जनतेचे तसेच प्रसारमाध्यमांचे लक्ष जाणीवपूर्वक इतरत्र वळवण्यासाठीच हा वाद निर्माण केला जात आहे. राज्यात अजूनही योग्यपणे दुष्काळ जाहीर केला जात नाही. केवळ मंत्र्यांच्याच तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर होतो. राज्यात १ सप्टेंबरपासून अनेक ठिकाणी पाण्याचे टँकर सुरू झाले आहे. काही ठिकाणी ओला दुष्काळाची स्थिती आहे. सरकारचे या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष होत आहे.

राज्य जळत रहावे, ही भूमिका

नाना पटोले म्हणाले, राज्य सरकारने आधी कंत्राटी भरतीचा निर्णय घेतला मग कंत्राटी भरती रद्द केली. ती भरती रद्द केली तर नवीन धोरण काय? हे मात्र जाहीर केले नाही. मिडियाचे पूर्ण लक्ष या मुद्द्यांवरुन हटवण्यासाठीच मराठा-ओबीसी वाद निर्माण केला जात आहे. राज्य जळत रहावे आणि आपण गंमत पाहत रहावी, अशी सरकारची भूमिका दिसते.अजितदादांचा डेंग्यू एका रात्रीत बरा

अजितदादांच्या आजारपणावर टोला लगावताना नाना पटोले म्हणाले, राज्याच्या



मंत्रिमंडळात नुसता तमाशा सुरू आहे. सरकारमधीलच एक मंत्री डेंग्यू झाला म्हणून घरी बसतो आणि एका रात्रीत त्यांचा डेंग्यू बरा होतो आणि ते दिल्ली गाठतात. आपल्या फायली अडवल्या जात असल्याचे गाऱ्हाणे ते दिल्ली दरबारी मांडतात. मंत्रिमंडळातच असा तमाशा सुरू असेल तर जनतेनी कोणाकडे पाहावे.ठाण्यातील एकाच कंत्राटदारावर खैरातनाना पटोले म्हणाले, सरकार शासन आपल्या दारी कोणाच्या खर्चाने करत आहे, हे आधी सांगावे. या कार्यक्रमाच्या केवळ पेंडॉलचा खर्च साडेतीन कोटींचा आहे. राज्यातील सर्व कार्यक्रमांचे कंत्राट ठाण्यातील एकाच कंत्राटदाराला देण्यात आले आहे. हा कार्यक्रम जनतेसाठी नव्हे तर कंत्राटदारांसाठी आहे. अजून खेड्यापाड्यात रस्ते नाही आणि सरकार जनतेच्या पैशांची उधळपट्टी स्वत:च्या प्रसिद्धीसाठी करत आहे. त्यामुळे लोकांमध्येदेखील शासन आपल्या दारी कार्यक्रमावरुन वाद निर्माण होत आहे. सरकारच्या तिजोरीत खडखडाट असताना ही महानौटकी राज्याला भोगावी लागणार आहे.



# मुला- मुलींचे सौंदर्य व संपत्तीपेक्षा संस्कार, गुण पहा- ह.भ.प.राधाताई महाराज सानप

बीड । प्रतिनिधी

'समाजासाठी जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे; गर्दीपेक्षा दर्दी महत्त्वाची असून विवाह संस्था धोक्यात आल्याची चिंता व्यक्त करून विवाह जुळवताना मुला मुलींच्या सौंदर्य संपत्ती पेक्षा संस्कार व गुण याला प्राधान्य द्या!' असा आग्रह जेष्ठ कीर्तनकार तथा संत मीराबाई संस्थांच्या महंत ह भ प राधाताई महाराज सानप यांनी धरला.

मातृभूमी प्रतिष्ठान बीड संचलित अखिल भारतीय संत भगवान बाबा वंजारी समाज वधु वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधू वर मंडळ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संत महंतासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत आज रविवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर न्याय भवन येथे राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आणि गुणवंतांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी मार्गदर्शक म्हणून हभप राधाताई महाराज सानप मार्गदर्शन करीत होत्या. अध्यक्षस्थानी ह भ प मोहन महाराज खरमाटे होते.



भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव ना. पंकजा मुंडे दिपावाली दौऱ्यानिमित्त परळी शहरात आले असता दिपावली निमित्त शुभेच्छा देताना भाजपाचे उपाध्यक्ष महादेव ईटके, विकास हालगे, सुशील हरंगुळे, नितीन समशेटे, आश्विन मोगरकर आदी उपस्थित होते.

# संकट समयी भगवंताच्या चरणावर लिन व्हा

## हे सत्कर्मच आहे – भागवताचार्य एकनाथ महाराज पुजारी

बीड (प्रतिनिधी)

मी कोण आहे, माझे कर्म काय आहे हे शिकवण्याचे शास्त्र म्हणजे श्रीमद् भागवत ग्रंथ आहे. आत्मदेवाचा विवाह धुंदुबी सोबत झाला ती पतीचे कधीही ऐकत नसे. मुलावर चांगले संस्कार झाले नाही तर दुंधुभी सारखी संतान जन्मास ये ते आणी भक्ती, ज्ञान असेल तर गोकर्ण सारखा पुत्र जन्माला येतो म्हणून संपत्तीपेक्षा मुलांवर संस्कार आवश्यक असतात. आत्मदेवाना सर्व वेद पारंगत होते धर्मात सांगितल्याप्रमाणे सर्व गोष्टी त्यांना ज्ञात होत्या.शास्त्राने सांगितलेल्या सहा कर्माचे ते पालन करीत असत. आधी केले मग सांगितले या संत शिकवणी प्रमाणे ते जीवन जगत असत. आपल्या मिळालेल्या संपत्तीतून दान धर्म केलाच पाहिजे. तीर्थक्षेत्रावर जाऊन गोकर्णाने ज्ञानप्राप्ती, साधना केली. जीवनात प्रारब्ध प्रत्येकाचे वेगवेगळे असते, संकटाचा सामना करण्याची शक्ती आपल्याजवळ असणे आवश्यक असते. संकटाला घाबरून आत्महत्या करणे हा दोष असून गोकर्णाने आपल्या पित्यांना आत्महत्येपासून रोखून धर्मचरण करा, धर्म त्याग करू नका, लोकांच्या बोलण्याचा विचार करू नका. संकट समयी भगवंताच्या चरणावर लिन व्हा हे सत्कर्म आहे. सर्व गोष्टीचा त्या करून आत्मदेव बद्रीधामला निघून गेले. धुंधोवी वाईट मार्गाला लागून त्याने देव सुद्धा मोडी घातले आईकडे वारंवार पैशाची मागणी करू लागला पैसा पाहिजे त्याने आईचा खून केला संतती संस्कारक्षम घडवा असे आवाहन महाराजांनी या प्रसंगी केले.



पुढे बोलताना ते म्हणाले की गोकर्ण गावी येऊन आत्मदेवाच्या वाड्यात राहू लागले त्यांनी ज्ञानदानाचे कार्य सुरू केले. गोकर्णाने आपल्या बंधू प्रेमापोटी अनेक धर्म शोधून काढून भावाच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले सूर्यनारायणाची उपासना गोकर्णाने करून भावाच्या उद्धाराची याचना केली त्यावेळी सूर्यनारायणाने प्रसन्न होऊन श्रीमद् भागवत ग्रंथाचे पारायणाचे व्रत सांगितले. या ग्रंथ पारायणाने पिशाच्च, भूत, प्रेताची मुक्ती होते. अत्यंत पवित्र आणि पावन असलेला श्रीमद्भागवत महान ग्रंथ असून तो अत्यंत श्रवणीय आहे. सात दिवस गोकर्णाने श्रद्धापूर्वक श्रीमद् भागवत ग्रंथाचे पारायण करून गोकर्णाच्या ज्ञानाच्या परिणाम दुंदुभीवर होवून त्याचा उध्दार झाला. शुद्ध अंतकरणाने श्रीमद् भागवत कथा श्रवण केल्यास नक्कीच आपला उध्दार होईल. श्रीमद् भागवत हे भगवंताने सांगितलेल्या उत्तम शास्त्र असून भागवत रुपी नौकेतून आपल्या जीवनाचा उद्धार करू शकतो असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. यावेळी भागवताचार्य नंदकुमार महाराज रामदासी, भागवताचार्य अनिल महाराज निर्मळ आदींची उपस्थिती होती. कथेचे यजमान दिनकर कुलकर्णी व परिवाराच्यावतीने संत पूजन व महाआरती करण्यात आली यावेळी महिला पुरुष भावी भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशाखापट्टणम बंदरात अग्नितांडव!

## लागोपाठ ४० बोटींनी घेतला पेट; मच्छिमारांचे कोटींचे नुकसान

विशाखापट्टणम येथून मोठी बातमी समोर आलीये. शहरातील मासेमारी बंदरात एका बोटीत अचानक भीषण आग लागली आहे. आग पुढे वाढत गेल्याने या घटनेत ४० बोटी जळून खाक झाल्यात. घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्याअसून आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. या दुर्घटनेत ३० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज आहे. स्थानिक मच्छिमारांनी या बोटीला आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



नेमकं काय घडलं?


प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, रविवारी रात्री मच्छीमारी करून अनेक बोटी किनाऱ्यावर परतल्या होत्या. यावेळी अचानक एका बोटीत स्फोट झाल्याचा आवाज आला. अचानक झालेल्या स्फोटामुळे मच्छीमारांमध्ये भीतीच वातावरण पसरलं आहे. या स्फोटात बोटीला आग लागली. पुढे ही आग मोठ्या प्रमाणावर पसरली. आगीत तब्बल ४० बोटी जळून खाक झाल्यात.

या दुर्घटनेत आग नेकमी कशाने लागली याचे ठोस कारण अद्याप समजलेले नाही. स्फोट होऊन आग लागल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र काही मच्छीमारांनी या बोटीला आग लावली असावी असाही संशय अन्य मच्छीमारांनी व्यक्त केलाय. पोलिसांनी घटनास्थळी पाहाणी केली असून अधिक तपास सुरू आहे.मच्छीमारांसाठी आपल्या बोटी म्हणजे उदनिर्वाहाचे मोठे साधन. मात्र आता बोट जळून खाक झाल्याने पुढे काय करावं आणि जगावं कसं असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे.

# गणेश पेठेत 'मुळशी पॅटर्न' स्टाईल हत्या

## तरूणाचा थरारक पाठलाग करत इमारतीच्या टेरेसवर कोयत्याने केला खून

**पुणे: पुण्यात मागील काही दिवसांपासून कोयता गँगच्या दहशतीत वाढत होताना दिसत आहे. अनेकांच्या मुसक्या आवळून देखील कोयता गँगचा हैदोस संपताना दिसत नाही आहे. पुण्यात मुळशी पॅटर्न चित्रपटाचा थरार पुन्हा पाहायला मिळाला. पुण्यात पाळलग करत कोयत्याने हल्ला करत तरुणाचा खून करण्यात आला आहे. शहरामध्ये गुन्हेगारी कमी होताना दिसत नाही ज्यांचा खून होतोय ते देखील आणि जे खून करताय ते देखील अगदी कमी वयाचे युवक असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.**



पुण्यात कोयत्याने हल्ला करत तरुणाचा खून करण्यात आला आहे. रविवारी मध्यरात्री ही घटना घडली आहे. पाठलाग करून कोयत्याने हल्ला करून खून केला आहे. पुण्यातील फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला आहे. पाठलाग करत तरूणाला इमारतीच्या छतावर गाठले आणि कोयत्याने वार करत तरुणाचा खून करण्यात आला आहे.किरकोळ वादामधून तरुणावर कोयत्याने वार करत खून केल्याची महिती मिळत आहे.

बिल्डिंगच्या छतावर मध्यरात्री घटना घडली

पुण्यातील गणेश पेठेतील ओसवाल बिल्डिंगच्या छतावर मध्यरात्री ही घटना घडली आहे. सिद्धार्थ नंदकुमार हादगे असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार,सिद्धार्थ आणि आरोपींचे वाद झाले होते.आरोपी कोयते घेऊन त्याच्या मागे लागले तो ओसवाल बिल्डिंगच्या छतावर गेला असता आरोपींनी त्याला एकटे गाठत वार करून खून केला. पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किरकोळ कारणावरून पुण्यातील बाणेर परिसरात तरुणांवर गोळीबार करण्यात आला आहे. हल्ल्यात एक तरुण जखमी झाला आहे. निलेश पिंपळकर असे फिर्यादीचे नाव आहे. चतु:श्रुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. आदित्य रणावरे आणि सागर बनसोडे असे आरोपींचे नाव असून त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. हा सगळा प्रकार पुण्यातील बाणेर भागात असलेल्या महाबळेश्वर हॉटेल जवळ घडला.पोलिसांना घटनास्थळावरून गावठी कट्ट्याचा एक जिवंत राऊंड आणि दोन केसेस जप्त केल्या आहेत.

# दुष्काळ ग्रस्त सोयगाव तालुक्यात परीक्षा शुल्क परताव्याची निर्देश

## विद्यार्थ्यांची बँक खाते संकलित करण्याचे काम हाती

सोयगाव / प्रतिनिधी

दुष्काळ ग्रस्त सोयगाव तालुक्यात माध्यमिक आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत प्रविष्ठ होणाऱ्या २२६० विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परतावा करण्याचे आदेश रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयाने दिले आहे त्या अनुषंगाने रविवार पासून शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे आधार संलग्न असलेले बँक खाते संकलित करण्याचे काम हाती घेतले आहे

दरम्यान सोयगाव तालुक्यात फेब्रुवारी-मार्च २९२४ साठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी दोन हजार दोनशे साठ विद्यार्थी प्रविष्ठ झालेले आहे या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काच्या रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे सोयगाव तालुक्यात अति गंभीर दुष्काळाची घोषणा शासनाच्या वतीने (ता.३१) ऑक्टोबर ला केली होती त्यानंतर शिक्षण विभागाकडून दुष्काळ निवारण्यासाठी पहिली उपाय योजना हाती घेतली आहे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सोयगाव तालुक्यातील शाळा व महाविद्यालयना तातडीने विद्यार्थ्यांचे आधार संलग्न असलेले बँक खाते संकलित करून माहिती पाठविण्याचे निर्देश दिले आहे परीक्षा शुल्क परतावा साठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात आर टी जी एस द्वारे परीक्षा शुल्क परतावा करण्यात येणार आहे त्यामुळे दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना दिलासा मिळाला आहे...

विद्यार्थ्यांचे बँक खाते नसल्यास पालकांचे बँक खाते ग्राह्य धरण्यात येऊन रक्कमेची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे

दुष्काळा च्या उपाय योजना साठी तालुका प्रशासन अद्यापही झोपेत असून सोयगाव तालुक्यातील पाणी पुरवठा करणारे धरणे कोरडी ठाक झालेली असतांना मात्र सर्रास धरणांमध्ये पाण्याचा उपसा सुरू आहे मात्र महसूलची भरारी पथके याकडे दुर्लक्ष करत आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात आगामी काळात तीव्र पाणी टंचाई चे चटके सोसावें लागणार आहे जिल्हाधिकारी यांनी नुकतेच दुष्काळ ग्रस्त भागात सर्रास पाणी उपसा बंद करण्यासाठी विशेष भरारी पथक स्थापन करण्याचे आदेश दिले होते परंतु सोयगाव तहसील कार्यालय च्या भरारी पथकांनी मात्र अद्यापही अवैध पाणी उपसा वर तालुक्यात प्रतिबंध केलेला नाही त्यामुळे आगामी काळात सोयगाव तालुक्यात पाणी बाणी चे संकट कोसळणार असल्याचे चित्र आहे.....




महाराष्ट्र राज्याचे आदर्श आमदार रोहीत दादा पवार याच्या संकल्पनेतून निघालेल्या पुणे ते नागपुर महाराष्ट्रातील युवकांच्या प्रश्नासाठी युवा संघर्ष यात्रेचे बीड जिल्ह्यात आगमन झाले. दिनांक १९ नोव्हेंबर २०२३ रोजी, सकाळी ७ पासून पाटोदा येथुन सहभागी झालो.

त्यावेळी संघर्ष यात्रे दरम्यान आ.रोहित दादांनाच्या सोबत चालत असताना अनेक गोष्टींचा जवळून अनुभव आला. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी यांच्या विविध समस्येवर चर्चा करून त्यांना खंबीरपणे आधार देताना, भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपला माणूस आपल्या हक्काचा माणूस वाटत होते,

रोहित दादा....

हे भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या भावनेतून जाणवत होते, हे आम्ही स्वतः अनुभवले.

डॉ उत्तम खोडसे

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,केज

# तब्बल २५ वर्षांनी माजी विद्यार्थ्यांची शाळा पुन्हा भरली

पाचोड:पंचवीस वर्षांपूर्वी एकत्र शिकत असलेल्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा शाळा भरली.वयाची चाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी मित्र-मैत्रिणी सोबतच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. (पाचोड ता.पैठण) येथे पंचवीस वर्षांपूर्वी जवाहर कनिष्ठ महाविद्यालय मध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनाचा गेट टु गेदर हा कार्यक्रम दाभरुळ ता.पैठण येथील नंदनवन येथे शनिवारी (दि.१८) मंगलकार्यात संपन्न झाला आहे. या गेट टु गेदर स्नेह संमेलनात ६० पेक्षा अधिक विद्यार्थी, विद्यार्थिनी होते.

तब्बल पंचवीस वर्षांनंतर एकत्र आले वर्गमित्र शाळा,कॉलेजचे दिवस संपले की प्रत्येक जण आपापल्या करिअरसाठी वेगवेगळ्या क्षेत्राकडे धाव घेतो मात्र ज्या शाळेमध्ये ज्या कॉलेजमध्ये आपण शिकलो लहानचे मोठे झालो वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांबरोबर आपण मैत्रीची संबंध जोडले ती नाळ मात्र तशीच असते,सर्वांना एकदा भेटावे,एकमेकांशी हितगुज करावे असे प्रत्येकाला वाटते मात्र वीस वर्षांचा मोठा कालखंड लोटल्यानंतर प्रत्येक जण आपापल्या नोकरी धंद्यात व्यस्त असल्याने ते सहजासहजी शक्य होत नाही, मात्र ते अशक्यही नाही हे जवाहर कनिष्ठ महाविद्यालय पाचोड येथून सन १९९६-९७ साली उत्तीर्ण होऊन गेलेल्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.



## जवाहर महाविद्यालयाचे १९९६ सालीच्या विद्यार्थ्यां तब्बल २५ वर्षांनंतरच्या भेटीनंतर मित्रमैत्रिणीं भारावले

ज्या शाळेत आपण लहानच मोठे झालो ज्या मातीने आपल्याला घडवलं आयुष्य जगण्याचं तंत्र मंत्र दिले त्या भूमीत पुन्हा एकदा त्याच संवगड्यासह एकदा पुन्हा रमण्याची संधी चालून आली ती माजी विद्यार्थ्यांच्या भेटीच्या निमित्ताने झाली आहे. गेट-टुगेदर मध्ये यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देताना शाळेतल्या गमतीजमती सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच समाजात वावरताना एकमेकांना आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. शाळेतील सवंगडी, शाळेचा वर्ग, लाकडी बाक यांची आठवण प्रत्येकाच्या मनात आयुष्यभर घर करून असते. शाळा सोडल्यावर पुन्हा लाकडी बाकांवर बसण्याची इच्छा अनेकांच्या मनात वारंवार येतेच. म्हणूनच अशा स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमांमध्ये अरुण कळमकर, तीर्थराज चावरे, राहुल नाराळे, मनोज गोजरे, दत्तात्रय भुमरे, महेश तारे, आबा भुमरे, हरीचंद्र ठोके,हनुमान नरवडे, काकासाहेब ढीलपे, संजय मापरी, भाऊसाहेब जगताप, संतोष दळवी,अंजली पाटील, ज्वाला भोसले, छाया चावरे, ज्योती खडके आदी जणं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दाभरुळ ता.पैठण येथील नंदनवन हॉटेलमध्ये जवाहर माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांची स्नेह मिलन कार्यक्रम पार पडला.(छाया:अनिस कुरैशी पाचोड)



# शांति व भाईचारा चा संदेश देणारा इज्तेमासाठी जय्यत तयारी

## मांजरम पेट्रोल पंपा परिसरात इज्तेमा

नांदेड़-(प्रतिनिधी)

मांजरम ता. नायगाव गडगा-मांजरम रोडवर पेट्रोल पंपा बाजूला मुस्लिम समाजाचे जिल्हास्तरीय दोन दिवसीय तबलीगी इजतेमा हा दिनांक २४,२५ नोहेंबर रोजी होणार आहे त्यासाठी असंख्य नागरीकांचा उपस्थित मैदानाचा कामांची जय्यत तयारी सुरू झाली आहे

नांदेड जिल्हयातिल नायगाव तालुका मांजरम पेट्रोल पंपा नजदीक येथे मुस्लिम धर्माचा जिल्हासतरीय दोन दिवसीय तबलीगी इजतेमा २४,२५ नोहेंबर रोजी अयोजित करण्यात आला आहे परिसरातील अंदाजे दहा ते विस हजार मुस्लिम समाज बांधव उपस्थित रहाणार असल्याची शक्यता आहे यासाठी भव्य इजतेमा मंडप रस्ता, वीज, जेवनाचे चार झोन, पाण्याचे झोन, नमाज पठन साठी जागा, वजू खाने, वाहाण पार्किंग, शौचालय सह इतर विविध कामासाठी मागिल १५ दिवसापासुन मुस्लिम समाज बाधवानी दिवस रात्र काम युद्धपातळीवर चालु आहे या इजतेमा साठी नांदेड जिल्हा व ग्रामीण भागातील मुस्लिम समाजतील नागरिक मोठ्या संखेने उपस्थित राहणार आहेत दोन दिवसीय तबलीगी इजतेमा साठी नांदेड, पुणे येथील मुस्लिम मौलाना (धर्मगुरू) पवित्र कुरान व प्रेषित मोहम्मद पैगम्बर यांच्या संगीतलेल्या उपदेश प्रवचन कारणार आहेत तरी सर्व मुस्लिम धर्मीय नागरीकानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अव्हान शेख जावेद इब्राहीम साब यांनी केले आहे



इस्रायल-हमास यांच्यामध्ये मागील बऱ्याच दिवसांपासून युद्ध सुरू आहे. युद्धाचा आज ४५ वा दिवस आहे. इस्रायलचे सुरक्षा दल हमासचे तळ सातत्याने उद्ध्वस्त करत आहेत. इस्रायलच्या सुरक्षा दलाने (आयडीएफ) गाझा पट्टीतील सर्वात मोठे रुग्णालय अल-शिफा रुग्णालयाखाली हमासने खोदलेल्या बोगद्याचा व्हिडिओ रविवारी प्रसिद्ध केला. हा बोगदा ५५ मीटर लांब आणि १० मीटर खोल आहे. हमासने मात्र आपले बोगदे रुग्णालयांसारख्या नागरी पायाभूत सुविधांमध्ये असल्याचा इन्कार केला आहे.

# आम्ही तुमच्यासोबत आहोत

## आज आणि नेहमीपराभवानंतर टीम इंडियाला पंतप्रधान मोदींनी दिला पाठिंबा

अहमदाबाद: आयसीसी क्रिकेट विश्वचषक २०२३च्या अंतिम सामन्यात भारताला हरवत ऑस्ट्रेलियन संघाने सहा विकेटनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाचा संघ सहाव्यांदा चॅम्पियन ठरला. तर तिसऱ्यांदा खिताब जिंकण्याचे भारताचे स्वप्न भंगले. सोबतच भारताच्या यजमानपदाखाली खेळवण्यात आलेल्या आयसीसी वनडे विश्वचषक २०२३ची सांगता भारतासाठी निराशाजनक ठरली.

यावेळेस पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताच्या खेळाडूंचे सांत्वन केले. त्यांनी लिहिले, प्रिय टीम इंडिया, वर्ल्डकपदरम्यान तुमची प्रतिभा आणि दृढ संकल्प उल्लेखनीय होता. तुम्ही खूपच छान खेळलात आणि देशाला गौरव मिळवून दिलात. आम्ही आज आणि नेहमीच तुमच्यासोबत उभे आहत.तर काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले, टीम इंडिया तुम्ही संपूर्ण स्पर्धेत जबरदस्त कामगिरी केली. जिंकलात किंवा हरलात आम्ही तुमच्यावर प्रेम करतो. सोबतच विश्वचषकात शानदार विजयासाठी ऑस्ट्रेलियाचे अभिनंदन.

रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रंगलेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताला सहा विकेट राखत हरवले. या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २४१ धावांचे आव्हान दिले होते. मात्र पॅट कमिन्सच्या संघाने हे आव्हान ४३ षटकांतच पूर्ण केले. ऑस्ट्रेलियाचा संघ सहाव्यांदा विश्वविजेता ठरला.



# राष्ट्रवादी काकांना की पुतण्याला?

## निवडणूक आयोगात आजपासून घमासान, डे टू डे होणार सुनावणी

नवी दिल्ली: राष्ट्रवादीतील अभूतपूर्व फूटीनंतर पक्षात दोन गट पडले आहे. राष्ट्रवादीतील दोन्ही गटात कायदेशीर लढाई सुरू आहे. राष्ट्रवादी पक्ष कोणाचा आणि घड्याळ चिन्ह कोणाचं यावर निवडणूक आयोगात आजपासून डे टू डे सुनावणी होणार आहे.अजित पवार गट आणि शरद पवार गटाकडून निवडणूक आयोगासमोर आजपासून बाजू मांडण्यात येणार आहे. त्यामुळं आता राष्ट्रवादी काकांना मिळणार की पुतण्याला?, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. पुढचे काही दिवस सुनावणी सलग होऊन आयोग निकाल राखून ठेवण्याची शक्यता आहे. दरम्यान शरद पवार आज दिल्लीत आहेत. त्यामुळे सुनावणीवेळी ते उपस्थित राहणार का हे पाहणं महत्वाचं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस कोणाची यासंदर्भात आज (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजता



सुनावणीला सुरुवात होणार आहे. यामध्ये निवडणूक आयोग राष्ट्रवादी नेमकी कोणाची याबाबत दोन्ही गटांचे म्हणणे ऐकून घेणार आहे. या सुनावणी दरम्यान निवडणूक आयोग जो शिवसेनेला न्याय तो राष्ट्रवादीला न्याय अशा अनुषंगाने निर्णय देणार की शरद पवार यांनाच राष्ट्रवादी पक्ष मिळणार याकडे संपूर्ण महाराष्ट्रसह देशाचे लक्ष लागलं आहे. अजित पवार गटाकडून सुमारे २० हजार बोगस शपथपत्रकं दाखल करण्यात आल्याचा आरोप मागील सुनावणीत शरद पवार गटाने केला होता.

# उसाच्या बैलगाडीला धडकून युवक ठार

पाचोड पैठण रस्त्यावरील दादेगाव फाट्यावरील घटना..

पाचोड/ दुचाकीवरुन घराकडे निघालेल्या युवकाची दुचाकी उसाच्या बैलगाडीला पाठीमागून धडकून झालेल्या दुर्घटनेत युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्घटना पाचोड पैठण रस्त्यावरील दादेगाव हजारे ता.पैठण फाट्या जवळ शनिवारी दि,१८ संध्याकाळी घडली...

ओम भाऊसाहेब हजारे वय (२०) असे मयताचे नाव आहे.या अपघता विषयी अधिक माहिती अशी की,दादेगाव हजारे ता.पैठण येथील ओम हजारे हा शनिवार सायंकाळी आपल्या शेतातून दुचाकी क्रमांक एम एच २० जीपी ५२४७ वरुन घरी जात असतांना पाचोड पैठण राज्य महामार्गवरील दावरवाडीकडून दादेगावकडे येत असतांना त्यावेळी उसाने भरलेल्या बैलगाडीच्या पाठीमागून दुचाकी धडकली या दुर्घटनेत ओम हजारे हा गंभीररीत्या जखमी झाला.त्याच्या डोक्यासह छातीला जबर मार लागला या घटनेची माहिती ग्रामस्थांना कळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत जखमी ओमला तातडीने पाचोडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता यावेळी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्याने प्राथमिक उपचार करुन प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचार दरम्यान रविवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पाचोड पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.





# अनोळखी वहानाच्या धडकेत दोघांचा मृत्यू

उमरगा - सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर उमरगा शहरापासुन दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या जकेकूरवाडी पाटीजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या अनोळखी वहानाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दोघांचाही मृत्यू झाला. रविवारी (ता. १९) रात्री साडेसातच्या सुमारास हा अपघात झाले. दोघेही मृत मुरुम (ता. उमरगा) येयील कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी आहेत.

या बाबतची माहिती अशी की, मुरुम बाजार समितीचे प्रभारी सचिव अण्णाराव कल्याणी कुंभार वय ५६ वर्ष रा. बेळंब ह. मु. महादेव नगर मुरुम व सुग्रीव श्रीरंग पाटील वय ५७ वर्ष रा. काळानिंबाळा ता. उमरगा ह. मु. यशवंतनगर मुरूम हे दोघे उमरगा येथून काम आटोपून मुरुमकडे दुचाकीवरून जात असताना अनोळखी वहानाने धडक दिली. त्यात अण्णाराव कुंभार यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघाताची माहिती मिळताच उमरगा - चौरस्ता येथे गेली बारा वर्षे अपघातग्रस्ताच्या मदतीला मोफत असलेली जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान नाणिज धामची रुग्नवाहीका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. गंभीर जखमी असलेले सुग्रीव पाटील यांना उप जिल्हा रुग्णालय दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. दोघांच्या मुत्यूने हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान दोघेही कर्मचाऱ्यांची कांही महिन्यानंतर सेवानिवृत्ती होती.



# ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे चक्का जाम आंदोलन

## पहिला हप्ता प्रतिटन साडेतीन हजार रुपये देण्याची मागणी; स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून आयोजन

सांगली : उसाला पहिला हप्ता प्रतिटन साडेतीन हजार रुपये मिळावेत, मागील हंगामातील उसाला चारशे रुपयांप्रमाणे दुसरा हप्ता मिळावा, या मागणीसाठी रविवारी जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे इस्लामपूर-सांगली, गुहागर विजापूर, पलूस-सांगली या प्रमुख मार्गावरील वाहतूक खंडित झाली.

मागील हंगामात गाळप झालेल्या उसाला प्रतिटन चारशे रुपयांचा दुसरा हप्ता मिळावा, या मागणीसाठी गेल्या एक महिन्यापासून संघटनेचे आंदोलन सुरू आहे. मात्र, साखर कारखान्याकडून या मागणीला अद्याप अनुकूलता दर्शवण्यात आलेली नाही. शेतकरी

संघटनेने मागील हंगामातील दुसरा हप्ता व चालू हंगामासाठी पहिल्या टप्प्यात साडेतीन हजार रुपयांची मागणी केली आहे. मात्र, याबाबत कारखानदारांकडून कोणतीच भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. या मागणीसाठी झालेल्या चर्चेच्या दोन फेऱ्या निष्फळ ठरल्याने आज चक्काजाम आंदोलन हाती घेण्यात आले. इस्लामपूर मार्गावरील लक्ष्मी फाटा येथे, गुहागर विजापूर मार्गावरील पलूस येथे, पलूस मार्गावरील नांद्रे येथे कवठेमहांकाळ मार्गावरील शिरढोण येथे आणि बोरगाव फाटा, तुरची आदी ठिकाणी स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन सुरू केल्याने या मार्गावरील सर्व वाहतूक खंडित झाली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

गत हंगामात इथेनॉल विक्रीतून कारखान्यांना चांगला पैसा मिळाला असल्याने यातील ४०० रुपये प्रतिटन देण्याची आमची मागणी असून, यंदा साखरेलाही बाजारात चांगला दर असल्याने यंदाच्या हंगामात पहिला हप्ता साडेतीन हजार रुपये मिळावेत, या मागणीसाठी आमचे आंदोलन सुरू असून, कोणत्याही परिस्थितीत हक्काचे पैसे मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी सांगितले.कोल्हापूर जिल्ह्यात चक्काजाम आंदोलन कोल्हापूर : स्वाभिमानीच्या या अनेक ठिकाणी झालेल्या आंदोलनामुळे वाहतूक विस्कळीत झाली होतो. ऊस दरवाढीच्या मुद्यावरून गेल्या महिन्यापासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन सुरू केले आहे. मागणीला यश येत नसल्याने कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT